| | |
|---|---|
| MHOS040002502018 | **रे.दि.मु. नं. २५/२०१८**<br>**चंद्रशेखर व इतर ..वि.. रावसाहेब व इतर** |

**रे.दि.मु.नं. २५/२०१८ मधील निशाणी क्र. ४१,४३ व ४५**

**खालील एकत्रीत आदेश**

प्रस्तुत वादींनी मयत प्रतिवादी क्रं.१ नामे–**रावसाहेब दादाराव निंबाळकर** यांचे वारस म्हणुन त्यांना अभिलेखावर घेण्यासाठी झालेला ॲबेटमेंटचा आदेश रद्द होण्यासाठी, झालेला उशीर माफ करण्यासाठी व मयत वादीचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी दाखल केलेले आहेत.

२. अर्जात प्रस्तुत अर्जदारांनी कथन की, मयत वादीने प्रस्तुतचा दावा हा अतिक्रमीत क्षेत्राचा ताबा मिळणेबाबत व निरंतर मनाई हुकुम मिळणेसाठी दाखल केला आहे. वादी रावसाहेब दादाराव निंबाळकर हे दिनांक ०८/०२/२०२५ रोजी मयत झालेले आहेत. वादींच्या कथनानुसार प्रतिवादी क्रं. १ यांचे वारसांची पत्ते मिळण्यास अडचण निर्माण झाली होती. तसेच त्यांच्या वारसांची पुर्ण नावे व पत्ते वादींना मुदतीत प्राप्त झालेली नाहीत. त्यामुळे त्यांना प्रतिवादी क्रं. १ चे वारस अभिलेखावरती घेण्यास विलंब झाला आहे. परिणामतः त्यांचे विरुध्द दावा अबेट करण्याचा हुकुम झाला आहे.

करीता वादींनी प्रतिवादी क्रं. १ चे वारसांना रेकॉर्डवर घेण्यास झालेला उशिर माफ करण्याची व प्रतिवादी क्रं. १ विरूध्द झालेला दावा अबेटचा आदेश रद्द करणेत यावा अशी त्यांनी विनंती केली आहे. तसेच मयत प्रतिवादी क्रं. १ चे वारस पुढीलप्रमाणे असुन त्यांना दाव्यात प्रतिवादी क्रमांक १–१. शैलाबाई रावसाहेब निंबाळकर–पत्नी, १–२. गणेश रावसाहेब निंबाळकर–मुलगा, १–३. महेश रावसाहेब निंबाळकर–मुलगा व १–४. योगेश रावसाहेब निंबाळकर–मुलगा असे प्रतिवादी क्रं. १ चे वारस म्हणुन समाविष्ट करण्यात यावेत अशी विनंती केली.

३. प्रतिवादींनी प्रस्तुत अर्जावर त्यांचे म्हणणे दिलेले नसल्यामुळे प्रस्तुतचे अर्ज त्यांचेविरुध्द विनाम्हणणे चालविण्यात आले.

४. वादींचे विधीज्ञ यांचा युक्तिवाद ऐकला. वादींनी प्रतिवादी क्रं. १ यांच्या मृत्युप्रमाणपत्राची प्रत दाखल केली आहे. सदर मृत्युप्रमाणपत्रावरुन प्रतिवादी क्रं. १ रावसाहेब दादाराव निंबाळकर यांचा मृत्यु दिनांक ०८/०२/२०२५ रोजी झालेला आहे. वादींनी त्यांचे अर्जातील कथनाचे पुष्टयर्थ अनुक्रमे नि. ४२,४४ व ४६ वरती शपथपत्र दाखल केले आहेत. वादी यांनी अर्जामध्ये मयत प्रतिवादी क्रं. १ चे वारस अभिलेखावर न घेण्याचे कारण शपथेवर कथन केले आहे व सदरचे कारण संयुक्तिक दिसुन येते. प्रस्तुतचा

दावा स्थावर मिळकतीसंदर्भात असून वादी व प्रतिवादी यांचे दावा मिळकतीमध्ये मौल्यवान हक्क व अधिकार गुंतलेले आहेत. अशा प्रकारच्या अर्जाबाबत अत्यंत ताठर भुमिका घेणे योग्य होणार नाही. उलटपक्षी दाव्यातील परिस्थिती विचारात घेवून पक्षकारांना न्याय मिळेल अशा प्रकारची भुमिका घेणे आवश्यक आहे.

**५.** वादीने प्रस्तुतचा दावा हा अतिक्रमीत क्षेत्राचा ताबा मिळणेबाबत व निरंतर मनाई हुकुम मिळणेसाठी दाखल केला आहे. प्रतिवादी क्रं. १ चे मृत्यूनंतर त्यांचे वारसांना दावा चालविण्याचा हक्क व अधिकार आहे. प्रस्तुत अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादींचे कसलेही नुकसान होणार नाही. याउलट, अर्ज नामंजूर केल्यास उभय पक्षकारांचे अपरिमीत नुकसान होणार आहे. सबब, दाव्यातील सर्व मुद्दयांवर संपूर्णपणे व कायमस्वरुपी निर्णय होण्यासाठी अर्ज मंजूर करणे न्यायाचे होईल. करीता मी खालील आदेश देत आहे –

## आ दे श

१. अर्ज नि.क्र. ४१, ४३ व ४५ खर्च रुपये १०००/– सह मंजूर करण्यात येतात.

२. वादींनी मयत प्रतिवादी क्रं. १ नामे रावसाहेब दादाराव निंबाळकर यांचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी झालेला विलंब हा तालुका विधी सेवा समिती तुळजापूर यांचेकडे रक्कम रु.१०००/– खर्च अदा करण्याचे अटीवर माफ करण्यात येत आहे.

३. मयत **प्रतिवादी क्र. २ रावसाहेब दादाराव निंबाळकर** यांचे वारस मुदतीत अभिलेखावरती न घेतल्यामुळे झालेला दावा अबेट करणेचा आदेश रद्द करणेत येतो.

४. वादींना प्रतिवादी क्रं. १ यांचे वारस अभिलेखावर घेण्यास परवानगी देण्यात येते.

५. वादींनी अर्जात मागणी केलेप्रमाणे दाव्यात दुरुस्ती करुन दुरुस्त दाव्याची प्रत पुढील तारखेपर्यंत अभिलेखावर दाखल करावी.

VIVEK VITHALRAO NIVGHEKAR

Digitally signed by VIVEK VITHALRAO NIVGHEKAR
Date: 2026.08.14 17:26:23 +0530

**दिनांक– १४/०८/२०२६.** **(व्ही. व्ही. निवघेकर)**

**ठिकाण – तुळजापुर.** **सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर,**

**तुळजापूर.**

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file Judgment/order are same, word to word, as per the original Judgment/order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | - | R.M. Kokare Stenographer Gr. III |
| Court | - | Jt.CJJD & JMFC Tuljapur |
| Date | - | 14.08.2026 |
| Order signed by the Presiding Officer on | - | 14.08.2026 |
| Order uploaded on | - | 14.08.2026 |